## BOMBAY ACT No. XVII OF 1956.

## AN ACT FURTHER TO AMEND THE INDIAN FOREST ACT, 1927, IN ITS APPLICATION TO THE STATE OF BOMBAY.

## सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम १७ वा.

[ राज्यपाल यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख १६ माहे एप्रिल सन १९५६ रोजीं प्रथम ( इंग्रजींत ) प्रसिद्ध केलेला. ]

**सन १९२७ चा भारताचा जंगलाबाबत अधिनियम मुंबई राज्यापुरता आणखी सुधारण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, सन १९२७ चा भारताचा जंगलाबाबत अधिनियम हा, यांत यापुढें दिलेल्या कारणासाठीं मुंबई राज्यापुरता आणखी सुधारणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे :—

लहान सरनामा.

१. या अधिनियमास सन १९५६ चा भारताचा जंगलाबाबत अधिनियम मुंबई राज्यापुरता दुसऱ्यांदा सुधारण्याबाबत अधिनियम असें म्हणावें.

सन १९२७चा भारताचा अधिनियम १६ वा याच्या २ ऱ्या कलमाची सुधारणा.

२. सन १९२७ चा भारताचा जंगलाबाबत अधिनियम याचें कलम २, रकम (४), पोट-रकम (अ) हींत, "टेंबुर्णीचीं पानें" या शब्दांनंतर, "रोशा गवत, रौवल्फिया सर्पगंधा ( सर्पेंटिना )" हे शब्द दाखल करावे.

(True translation)

J. H. DAVE,
Examiner of Books and Publications, Bombay.

## BOMBAY ACT No. XVIII OF 1956.

## THE BOMBAY STATE UNIVERSITIES (AMENDMENT) ACT, 1956.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची मंजुरी तारीख १४ माहे एप्रिल सन १९५६ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो यावरून सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

जे. आर्. धुरंधर,
मुंबई सरकारचे सचिव,
विधि विभाग.